Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ८ ] बुधवार, फेब्रुवारी १६, २०२२/माघ २७, शके १९४३ [पृष्ठे २ , किंमत : रुपये १८.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ७२.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**संदर्भ :-** (१) मा. अवर सचिव, नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. एमसीओ-२०२१-प्र.क्र. २०-नवि-१४, दिनांक २८ जानेवारी २०२२.

(२) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५.

(३) या कार्यालयाचे आदेश क्र. जिकागों-नपाप्र-कावि-६५-२०२२, दिनांक ८-२-२०२२.

(४) या कार्यालयाचे आदेश क्र. जिकागों-नपाप्र-कावि-७०-२०२२, दिनांक ९-२-२०२२.

(५) पिठासीन अधिकारी, नगर पंचायत, देवरी यांचे पत्र क्र.-नपदे-मुख्या-२६१-२०२२, दिनांक १६-०२-२०२२.

(६) मुख्याधिकारी, नगर पंचायत, सडक अर्जुनी यांचे पत्र क्र. नपअस-८९६-२०२२, दिनांक १६-०२-२०२२.

(७) पिठासीन अधिकारी, नगर पंचायत, अर्जुनी यांचे पत्र क्र. नपअ-सार्व-निवड-२०२०-२१-६०४-२०२२, दिनांक १६-०२-२०२२.

**आदेश**

क्रमांक जिकागों-नपाप्र-सी.आर-कावि-११२-२०२२.—

ज्याअर्थी, गोंदिया जिल्ह्यातील नगर पंचायत, देवरी, सडक अर्जुनी व अर्जुनी या तीन नगर पंचायतीमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुका २०२१-२२ चा निकाल दिनांक १९ जानेवारी २०२२ रोजी जाहीर करण्यात आला. सदर निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात ३१ जानेवारी २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आले. महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१(२) मधील तरतुदीनुसार निवडून आलेल्या नगरसेवकांची यादी प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून २५ दिवसांचे आंत अध्यक्षाच्या निवडणुकीकरिता जिल्हाधिकारी कळविले असे नमूद आहे. तसेच उक्त अधिनियमातील कलम ५१ पोटकलम (२) मधील तरतुदीनुसार प्रत्येक नगरपरिषदेचा एक उपाध्यक्ष असेल.

ज्याअर्थी, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३४१ (ब) व कलम ५१ चे पोटकलम (१०) नुसार कलम ५१, कलम ५१ (अ) तसेच ५२ अन्वये अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची अडीच वर्षाचे कालावधीसाठी निवड करण्याविषयीची विशेष सभा संदर्भिय क्र. (३) व (४) अन्वये आयोजित करण्यात आली. यासंदर्भात पिठासीन अधिकारी, देवरी, सडक अर्जुनी व अर्जुनी यांनी अध्यक्ष-उपाध्यक्ष यांचे निवड झाल्याचे कार्यवृत्त या कार्यालयास संदर्भिय क्र. (५), (६) व (७) अन्वये या कार्यालयास सादर केले आहे.

त्याअर्थी, मी, नयना गुंडे, जिल्हाधिकारी, गोंदिया नगर पंचायत देवरी, सडक अर्जुनी व अर्जुनी नगर पंचायत येथील निवडून आलेले अध्यक्ष-उपाध्यक्ष यांची नावे खालीलप्रमाणे अधिसूचित करित आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | नगर पंचायतीचे नाव | निवडून आलेल्या अध्यक्षांचे नाव | निवडून आलेल्या उपाध्यक्षांचे नाव |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | देवरी | श्री. संजु शेषलाल उईके | सौ. प्रज्ञा प्रमोद संगिडवार |
| २ | सडक अर्जुनी | श्री. मडावी तेजराम किसन | श्रीमती वंदना किशोर डोंगरवार |
| ३ | अर्जुनी | सौ. मंजुषा विरेंद्र बारसागडे | सौ. ललिता देवेंद्र टेंभरे |

गोंदिया :
दिनांक १६ फेब्रुवारी २०२२.

**नयना गुंडे,**
जिल्हाधिकारी, गोंदिया.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.